| | |
|---|---|
| MHND200002622026 | **इ.फौ.कि.अर्ज क्र.१७/२०२६**<br>**कृष्णा मुर्खे वि. महाराष्ट्र शासन** |

## निशाणी क्र.१ खालील आदेश

१. अर्जदार कृष्णा दिगांबर मुर्खे याने त्याचे ट्रॅक्टर वाहन ज्याचा क्रमांक एम.एच–२६–सी.ई–५०९७ त्याचे ताब्यात मिळण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. त्याने अर्जात कथन कले की, सदर वाहनाचा तो नोंदणीकृत मालक व ताबेदार असून तो त्याचा वापर शेतीच्या वैयक्तीक कामाकरीता करतो. उपरोक्त वाहन पोलीस ठाणे, माहूर यांनी त्यांचेकडील गुन्हा क्र.५३/२०२६ मध्ये जप्त केले असून सदर गुन्हयाचा त्या वाहनाशी काहीही संबंध नाही. अर्जदाराची उपरोक्त वाहन संबंधीत कार्यालयात तशीच पडून राहीली तर वाहनाचे पार्टस गंजून जाण्याची व खराब होण्याची शक्यता आहे व ते निरुपयोगी होईल. म्हणून सदरील वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्याबाबत योग्य तो आदेश व्हावा.

२. अर्जदाराने त्याच्या अर्जाचे समर्थनार्थ, वाहन नोंदणीची प्रमाणित प्रत, प्रथम खबर अहवाल प्रत व ओळखपत्र इ. कागदपत्रे दाखल केलेली आहे.

३. सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ती श्रीमती प्रसन्ना जांगडे यांनी त्यांचे लेखी कथन निशाणी क्र.१ वर सादर केले. तसेच तपासीक अधिका–याने त्यांचे लेखी कथन निशाणी क्र.५ वर सादर केले.

४. अर्जदारातर्फे त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. व्ही. यु. भावरे व सरकारतर्फे सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ती श्रीमती प्रसन्ना जांगडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्जाचे व सोबत जोडलेल्या कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, सकृत दर्शनी सदर वाहनाचा नोंदणीकृत मालक हा अर्जदार आहे. **मा.सर्वोच्च न्यायालयाने "सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार", ए.आय.आर. २००३, सुप्रिम कोर्ट, ६३८,** या खटल्यात घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ व ४५७ खालील अर्ज न्यायालयाने जलद गतीने निकाली काढले पाहिजेत. कारण अशा प्रकरणात संबंधीत वाहन किंवा वस्तू निरुपयोगी राहील्याने मालकाला विनाकारण नुकसान सहन करावे लागते.

**६.** उपरोक्त न्यायनिवाड्यातील मार्गदर्शक तत्वाचा या अर्जाच्या पार्श्र्वभुमीवर विचार केला असता, या गुन्हयात खटल्याची संपरिक्षा होवून गुण दोषावर निकाल लागण्यास बराच अवधी लागण्याची शक्यता आहे. अर्जदार त्या वाहनाचा धारक दिसून येतो. अशा परिस्थितीत जर अर्जदाराचे वाहन विना वापर स्थितीत संबंधीत कार्यालयाच्या आवारात पडून राहिले तर त्याचे नुकसान होवू शकते. म्हणून खटल्याची संपरिक्षा होईपर्यंत अर्जदारास त्या वाहनाचा तात्पुरता ताबा देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) जप्त मुद्येमाल ट्रॅक्टर ज्याचा क्र. एम.एच–२६–सी.ई–५०९७ हे वाहन अर्जदाराने पाच लाख (रु.५,००,०००/–) रुपये किंमतीच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर (Indemnity Bond) कार्यान्वीत करुन घेतलेनंतर पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे माहूर यांनी पुढील आदेशापर्यंत वाहनाचा ताबा तात्पुरता अर्जदारास द्यावा.

३) अर्जदाराने न्यायालयाच्या पूर्व परवानगी शिवाय सदर वाहनामध्ये कोणतेही बदल करु नयेत, अगर त्रयस्थ व्यक्तीस मालकी हक्काने हस्तांतरीत करु नये. तसेच न्यायालयाच्या आदेशान्वये वाहन न्यायालयात हजर ठेवण्याची तजवीज ठेवावी व तपासीक अंमलदाराने लेख कळवल्यास त्यांचे समोर सदर वाहन हजर ठेवावे.

४) अर्जदाराने सदर वाहनाचे दोन्ही बाजूंनी दोन वेगवेगळे रंगीत छायाचित्र काढून ती क्षतीपूर्ती बंधपत्रा सोबत तपासीक अंमलदाराकडे हजर करावेत.

५) तपासीक अंमलदाराने क्षतीपूर्ती बंधपत्र व छायाचित्र यांची वरील आदेशानुसार अर्जदाराकडून योग्य ती पूर्तता झाल्यानंतरच सदर वाहन अर्जदाराच्या स्वाधीन करावे व सदरची कागदपत्रे दोषारोपपत्रा सोबत न्यायालयात दाखल करावीत.

६) सदर आदेशाची एक प्रत माहूर पो.ठा.गु.र. क्र.५३/२०२६ मध्ये ठेवण्यात यावी.

Digitally signed by BHOOMIT ASHOK AGRAWAL
Date: 2026.03.27 17:13:20 +0530

ठिकाण– माहूर
दिनांक–२७/०३/२०२६

(बी. ए. अग्रवाल)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर.
जि. नांदेड

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द नि शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | श्रीमती रु.बि.मस्के |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | : | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासिन अधिकारी | | |
| यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक: | | ३०/०३/२०२६ |